# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.10/08/2017 रोजी (का.प.क्र.06) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त**

गुरूवार दिनांक 10/08/2017 रोजी (का.प.क्र.06) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 3.15 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग (अति.आयुक्त), नगर सचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
04. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
05. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे
06. स.स.सिध्दांत संजय शिरसाट
07. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
08. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
09. स.स.श्री.सोहेल शकिल शेख
10. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
11. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
12. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
13. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
14. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
15. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

मा.सभापती :बैठक सुरू करण्यापुर्वी सर्वाचे स्वागत करण्यात येते. धार्मिक स्थळाचे निष्कासनाचे काम चालू आहे. मा.न्यायालयाने काही सूचना व आदेश दिलेले आहे. मा.न्यायालयाचा अवमान होणार नाही याची चर्चा करतांना काळजी घेण्यात यावी. ॲक्शन पॉईट तयार केलेले आहे त्याचा आढावा घेण्यात येणार आहे,

श्रीमती किर्ती शिंदे :माजी नगरसेविका तसेच महिला व बालकल्याण समितीच्या माजी सभापती श्रीमती चंद्रकलाबाई दाणे यांचे काल दुःखद निधन झालेले आहे त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे,श्रीमती मनिषा मुंडे : अनुमोदन देण्यात येते.

मा.सभापती :माजी नगरसेविका तसेच महिला व बालकल्याण समितीच्या माजी सभापती श्रीमती चंद्रकलाबाई दाणे यांचे काल दुःखद निधन झालेले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.(सभागृहाच्या वतीने दोन मिनटे उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात येते)

श्री.सिताराम सुरे :धार्मिक स्थळासंदर्भात मा.न्यायालयाने दखल घेतली दिड वर्षापुर्वी धार्मिक स्थळांच्या आक्षेपावरील सुनावणी संदर्भात जे अर्ज आले होते, सुणावणी घेण्यासंदर्भात आदेशित केलेले आहे. त्यामुळे मा.आयुक्तांचे तसेच त्यांच्या सोबत इतर सर्व अधिकाऱ्यांचा अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात यावा, अशी विनंती करण्यात येते.

श्रीमती किर्ती शिंदे, श्रीमती मनिषा मुंडे, श्रीमती संगिता वाघुले, श्री.राजगौरव वानखेडे, श्री.रूपचंद वाघमारे, श्री.शेख सोहेल, श्री.अजीम अहेमद अनुमोदन देण्यात येते.

मा.सभापती :धार्मिक स्थळाबाबत स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य यांनी सविस्तर चर्चा केलेली आहे, तसेच धार्मिक स्थळाबाबत महानगरपालिकेची भूमिका मा.न्यायालयात मांडावी जेणे करून धार्मिक स्थळांना तसेच शहरातील नागरीकांना योग्य न्याय मिळेल. वस्तुस्थिती आपल्यासमोर ठेवली त्या वस्तुस्थितीनुसार मा.आयुक्त महोदय यांचेशी वेळोवेळी चर्चा केली. मा.आयुक्तांनी प्रकरणात मेहनत घेतली दखल घेतली त्यानुसार सुधारणा करण्यास सांगीतले. त्यानुसार मा.न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले. मा.न्यायालयाचे ते मान्य केले. त्यामुळे दिलासा मिळालेला आहे त्यामुळे सभागृहाच्या वतीने अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात येतो. वक्फ बोर्डाचे अभिनंदन करण्यात येते, सर्व संबधीत अधिकारी यांचे अभिनंदन करण्यात येते,

श्री.रेणुकादास वैद्य:मा.आयुक्त आणि विधी सल्लागार यांचे अभिनंदन करण्यात येते, मा.न्यायालयात महानगरपालिकेची बाजू सक्षमपणे मांडलेली आहे. मा.न्यायालयाचा अवमान होणार नाही, याची काळजी घेण्यात येईल. यादी चुकीची झालेली आहे. शांतीलाल भगवान श्वेतवाल दिगंबर जैन संस्थान हिचे नांव आहे, जुनी जी यादी झाली होती, त्यामध्येही दोन वेळा नांव होते, नविन यादीतही त्याचे दोन वेळेस नांव आहे, यादी ही निष्काळजीपणाने केलेली आहे. सिडकोतील विक्रीयोग्य भुखंड आहेत, सिडकोने मुभा दिलेली आहे रेडीरेकनरच्या 20 टक्के पैसे भरा आणि प्लॉट घ्या. प्रार्थनास्थळांना नोटीस दिलेल्या आहेत असे असतांना मनपा प्रशासनाकडुन पाडण्याबाबत प्रत्यक्ष स्थळावर जात आहेत. सिडको संचालक, मंडळाच्या दिनांक 04.01.2001ला मा.न्यायालयाने निर्णय घेतला होता की, प्रार्थनास्थळे नियमित करता येईल का? (ग्रिनबेल्ट,ओपनस्पेस) सिडकोच्या नियमावलीच्या अधीन राहुन निर्णय घेतलेला आहे, या निर्णयाच्या अनुषंगाने 11.03.2002 ला महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय काढुन बोर्ड ऑफ डायरेक्टरने दिनांक 04.01.2001 च्या निर्णयाला मान्यता दिलेली आहे. महापालिकेला सिडकोचे आणि महाराष्ट्र शासनाचे निर्णयाचे पालन करायचे आहे. जेणे करून सिडकोच्या सर्व ग्रिनबेल्ट व ओपनस्पेसच्या प्रार्थनास्थळांचा प्रश्न निकाली निघु शकेल. धार्मिक स्थळांच्या अ व ब व क वर्गीकरण केलेले आहे, ब वर्गाचे वर्गीकरण चुकीचे आहे. या यादीमध्ये मनपाच्या खुल्या जागेवर 318 आणि सिडकोच्या जागेवर 24 प्रार्थनास्थळे आहेत. ते निष्कासित करणेबाबतचे आहेत ते चुकीचे आहेत. मनपाच्या खुल्या जागा आहेत, तत्कालिन नगर संचालक, नगर रचना विभागाने प्रत्येक कॉलमचे एक लाईन लिहीलेली आहे, मनपाच्या खुल्या जागेवर असल्यामुळे नियमित करता येवु शकत नाही. नगर रचनाचे नियमाचे पालन केलेले नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949चे कलम 79 अ ते ड मध्ये जागा भाडे तत्वावर देणेबाबत कशी कार्यवाही करावी याबाबत स्पष्ट उल्लेख आहेत. नगर रचनाच्या नियमावलीमध्ये 24.3.8 मध्ये 10 टक्के अलाऊड होते, महानगरपालिकेने मनपाच्या खुल्या जागेवर असल्यामुळे नियमित करता येवु शकत नाही. असे दिले आहे जे की अक्षम्य अशी चुक आहे. विनंती आहे की, शासनाने घालुन दिलेले नियम आणि महानगरपालिकेचे नियमाद्वारे मनपाचे 318 आणि सिडकोचे 24 हे पुर्णतः नियमित होवु शकतात. महानगरपालिकेच्या प्रशासनाने सकारात्मक दृष्टीकोन ठेवला पाहिजे. शासनाच्या नियमात तीन टप्पे दिलेले आहेत, नियमित, स्थलांतरीत हे होत नसेल तर निष्कासित करण्याचा नियम आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने कारवाई का करत नाही. सुनावणी घेत असतांना या गोष्टींचा विचार

का करण्यात येत नाही, सुनावणीच्या अगोदर 318 आणि 24 नियमित करून घ्या, त्या नंतर सुनावणी घेण्यात यावी. वर्तमानपत्रामध्ये चुकून जाहिर प्रगटन दिले गेले आहे, असे प्रशासनाचा खुलासा आहे त्यामध्ये एका दिवसात आक्षेप स्विकारण्यासाठी दिलेला ओह ते कसे शक्य आहे. 1101 धार्मिक स्थळांचे आक्षेप एका दिवसात नोंदविणे कसे शक्य आहे. प्रशासनावी या संबधी बैठक झाली असे कळाले आहे, बैठकीत काय झाले याचा खुलासा करण्यात यावा. धार्मिक स्थळाची सुनावणी घेणार आहेत का? ब वर्गीकरणातील धार्मिक स्थळांची सुनावणी घेणार आहेत याचा खुलासा करण्यात यावा. नागरीकांनी जुने आक्षेप सादर केलेले आहेत, पुन्हा आक्षेप दाखल करण्याची काय आवश्यकता आहे. ज्यांनी आक्षेप दाखल केले नाही अशांनी आक्षेप दाखल करावे.

श्री.अजिम अहेमद:एक दिवसाचा सुनावणीचा वेळ कशाच्या आधारे दिलेला आहे. जाहिर प्रगटन दिल्यावर एका महिन्यात सुनावणी घेण्याबाबत आहे.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

विधी सल्लागार :मा.न्यायालयाच्या आदेशानुसार धार्मिक स्थळाबाबत सर्व कमिटी सदस्यांची रिसर्च सेंटर येथे बैठक बोलविण्यात आली होती. लेखी आदेश नसल्यामुळे उद्या पुन्हा बैठक बोलविण्यात आलेली आहे.

मा.सभापती :सुनावणीबाबत काही सूचना केलेल्या आहेत, त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :मा.न्यायालयाच्या आदेशानुसार आज जी बैठक झाली, त्यात सर्वसाधारणपणे 1101 चा मुद्दा तसेच मनपाचे खुल्या जागा तसेच सिडकोच्या जागांबाबत सकारात्मक आणि यादीबाबत चर्चा झालेली आहे. उद्याचा निर्णय फायनल होईल.

श्री.रेणुकादास वैद्य:प्रशासनाचे धन्यवाद प्रशासन सकारात्मक दृष्टीकोन ठेवलेला आहे. प्रशासनाला आम्ही सांगीतले की, शपथपत्र दाखल करा, नियमानुसार रेग्युलाईझ करू शकता, या गोष्टी आम्हाला सांगण्याची गरज काय? डबल डबल नांवे आलेली आहेत, जोपर्यंत सुस्पष्टता येत नाही, निकष कोणते लावणार आहेत, जनतेच्या भावनेशी प्रकरण जोडलेले आहेत.

श्री.अजिम अहेमद:निकष कोणते लावणार आहेत. याची माहिती द्यावी.

मा.आयुक्त :याबाबत उद्याच्या बैठकीत निर्णय होणार आहेत, प्रशासनाचा सकारात्मक दृष्टीकोण आहे.

विधी सल्लागार :खाजगी जागांबाबत प्रशासनाचे काय म्हणने आहे, हा मुद्दा उपस्थित झालेला आहे. महानगरपालिकेने प्रतिज्ञापत्रात म्हटलेले आहे की, सार्वजनिक जागेवरील, रस्त्यावरील प्रॉपर्टीज लीस्टमध्ये आलेल्या आहेत, तसेच सिडकोच्या जागेबाबतही मा.न्यायालयाला विनंती केलेली आहे, 342 ओपनस्पेस व इतर बाबत मा.न्यायालयाचे डायरेक्शन मागीतलेले आहे. मा.आयुक्तांतर्फे मा.न्यायालयात म्हणने मांडलेले आहे.

श्री.अजिम अहेमद :दोन Affidavit दाखल केलेले आहे, कारवाई सुरू केली नाही म्हणुन Affidavit दिले आहे, आणि 44 धार्मिक स्थळे निष्कासित केले म्हणुन Affidavit दिले आहे.

मा.सभापती :सिडकोच्या खुल्या जागा आणि महानगरपालिकेचे ओपनस्पेस वरील धार्मिकस्थळे रेग्युलाईझ करण्यासंदर्भात प्रशासनाने खुलासा केलेला आहे.

श्री. अजिम अहेमद:सन 2008मध्ये न्यायालयाच्या परिसरातील मजार काढण्यात आली होती आता पुन्हा त्यावर कारवाई केलेली आहे या संदर्भाने खुलासा करण्यात यावा.

विभाग प्रमुख (अतिक्रमण):जिल्हा न्यायालयाच्या परिसरामध्ये सन 2008 रोजी जे अनाधिकृत धार्मिक स्थळ होते, ही जी रिटपिटीशन दाखल झाली होती ती हया अनाधिकृत बांधकामाबाबत दाखल झाली होती, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बांधकाम पाडुन टाकण्यात आले होते, त्यानंतर मा.उच्च न्यायालयाने आदेशित केले होते की, शहरात असे किती अनाधिकृत

धार्मिक स्थळे आहेत, त्याचा सर्वे करून रिपोर्ट करावा. 2017 मध्ये जी यादी तयार केली त्यावेळेस ती दर्गा त्या ठिकाणी होती त्यामुळे ती कबर निष्कासित करण्यात आली आहे.

श्री.अजिम अहेमद : जागा हि ग्रीनबेल्ट म्हणुन लिहिलेली आहे.

विभाग प्रमुख (अतिक्रमण) : संपुर्ण जागा ही न्यायालयाच्या मालकीची आहे, पीआर कार्ड आहे, यापुर्वीची जी कागदपत्रे होती ती मा.न्यायालयाच्या आदेशाने रद्द करण्यात आलेली होती. सन 2008 मध्ये रद्द झालेले आहे, शासकीय जागा आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :यादीमध्ये धार्मिकस्थळे आहेत ते लिजवर देवुन रेग्युलाईझ करू शकतो, 342 चा स्वतंत्र वर्गीकरण मा.न्यायालयात सादरर करण्यात यावा मनपाच्या नियमानुसार धार्मिकस्थळे रेग्युलाईझ होऊ शकतात. शपथपत्र मा.न्यायालयात सादर करण्यात यावे.

श्री.राजगौरव वानखेडे : 805 धार्मिकस्थळाचे आक्षेप आलेले आहेत, त्याची सुनावणी घेणे बाकी आहे, आता आक्षेप मागवुन घेणार आहेत का? ज्या कुणाचे आक्षेप दाखल करणे राहिले असतील त्यांनी आक्षेप दाखल करण्याबाबत प्रशासनाला आदेशित करण्यात यावे.

श्री.शेख मतीन :धार्मिक स्थळाच्या जाहिर प्रगटनामध्ये सुनावणीचाही उल्लेख केलेला आहे. जाहिर प्रगटन देतांना प्रशासनाकडुन चुक झालेली आहे ही चुक कशी होऊ शकते, विधी विभाग व सक्षम अधिकारी असतांना अतिशय संवेदनशिल विषयाबाबत कशी चुक होऊ शकते, संबधीतांवर कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती :धार्मिक स्थळाबाबत स.सदस्यांनी आपआपल्या भूमिका मांडलेल्या आहेत. दिलेल्या सूचनेप्रमाणे मा.न्यायालयात Affidavit सादर केले, त्यामुळे दिलासा मिळालेला आहे. सुनावणीमध्ये काही त्रृटी राहु नये, मनपाच्या 328 आणि सिडकोच्या 24 जागांबाबत रेग्युलाईझ करण्याबाबत शासनाच्या नियमाप्रमाणे तसेच मनपाच्या नियमाप्रमाणे रेग्युलाईझ करण्यासंदर्भाने मा.न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यात यावे.

श्री.शेख मतीन :यादी चुकीची दिली, प्रशासनाने चुक केली. सक्षम अधिकारी यांचेकडुन चुक होती कशी?

मा.सभापती विभागाने सविस्तर माहिती दिलेली होती. मा.न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. सुधारणा करण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न केलेला आहे, 50 टक्के धार्मिकस्थळांबाबत प्रश्न निघु शकतील असा निर्णय आहे, मनपाच्या आणि सिडकोच्या जागांबाबत रेग्युलाईझ करण्याबाबत मा.न्यायालयात Affidavit दाखल करावे, आपले म्हणने मा.न्यायालयात मांडावे.

श्री.शेख मतीन :मा.न्यायालयाने मनपास कित्येक वेळेस विचारणा केली होती. चुक झाली आहे. नागरीकांशी निगडीत विषय आहे.

मा.सभापती :जाहिर प्रकारे या विषयावर चर्चा करण्यात येवु नये.

श्री.राजगौरव वानखेडे : भुमिगत योजनेसंदर्भात टेक्निकल ऑडीट दिले आहे, येणाऱ्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येईल. वाढीव दराची निवीदा मंजूर केलेली आहे अंदाजे रक्कम 100 कोटी जो की, मनपाचा हिस्सा राहणार आहे, आर्थिक तरतुद वर्क आर्डर देण्याच्या अगोदर सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेतली होती का?

कार्यकारी अभियंता:सन 2012-13च्या डिएसआर हिशोबाने 30.88 above होता, सन 2013-14 मध्ये काम केलेले आहे. सन 2012-13 आणि 2013-14 चा रिफ्लेक्ट कॅलक्युलेट केलेला आहे. 2.14 above सन 2013-14 ला होता, त्यानुषंगाने प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे गेला होता, मा.स्थायी समितीची त्यास मान्यता झालेली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :वर्क ऑर्डर देण्यापुर्वी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यायला पाहिजे होती.

कार्यकारी अभियंता :एजन्सी फिक्सींगचीबाब आहे, स्थायी समितीच्या अधिकारातील आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सुधारित प्रस्ताव मान्यता घेणे आवश्यक होते का? 98 कोटी रूपये एक्स्ट्रा देणार आहोत.

कार्यकारी अभियंता :प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर मा.सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव आणला होता, धोरणात्मकबाबत म्हणुन 98 कोटी रूपये उभारण्यासाठी लोन हुडकोच्या माध्यमातुन घेण्यासंदर्भातील होता.

श्री.राजगौरव वानखेडे :मान्यता घेणे आवश्यक होती परंतु ती घेण्यात आलेली नाही. एक वर्षाच्या पाठपुराव्यानंतर तपासणीकरीता टिम देण्यात आलेली आहे असे म्हणने आहे. सन 2014 ते 2016 पर्यंतची थर्डपार्टी इन्स्पेक्शन कुणी करायची.

कार्यकारी अभियंता :मार्च 2015मध्ये सुरू केलेली आहे. तीन्ही कॉलेजला विचारणा केली होती, इंजिनिअर कॉलेजची ऑफर जास्त होती, Negotiation ला वेळ लागलेला आहे. झालेल्या कामाचे 100 टक्के ऑडीट करायचे होते. त्यांनी सुरूवातीपासून ऑडीट सुरु केलेली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :70 टक्के काम झाल्यानंतर पाईप टाकल्यानंतर ऑडीट करण्यात येत आहे. पाईप काढुन त्यांनी तपासणी केली आहे का? लाईन चोकअप तसेच इतर बार्बीविषयी जबाबदारी कुणाची आहे. थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करणा-यांचे नांवे देण्यात यावी. 31 ऑक्टोबर 2017 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे का?

कार्यकारी अभियंता :मुदतवाढ दिली आहे. मा.आयुक्तांची मान्यता घेतलेली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :चार महिन्यांची मुदतवाढ देतांना सक्षम प्राधिकरणाची मंजूरी असणे आवश्यक आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :या योजनेबाबत जी पीएमसी नेमण्यात आलेली आहे. त्या पीएमसीवर कोणतीही कार्यवाही करतांना दिसुन येत नाही. सातत्याने मागील बैठकांमध्ये मुद्दे मांडत आहे ज्या चुका झालेल्या आहे त्या तपासण्याची जबाबदारी पीएमसीची आहे. पीएमसीने योग्य काम केले की, नाही हे तपासणार कोण? पीएमसीने काम केले की, नाही हे तपासण्याचे काम केले पाहिजे. त्याची जबाबदारी कुणाची, पीएमसीला नोटीस दिलेल्या आहेत का? पीएमसीवर दंडात्मक कारवाई केली आहे का? पीएमसीला नोटीस केव्हापासून दिल्यात. पीएमसीची नियुक्तीची दिनांक काय आहे? पीएमसीने आत्तापर्यंत काय काम केलेले आहे, पीएमसीने प्रशासनाला कोणते पत्रव्यवहार, सूचना केलेल्या आहेत याची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :स.सदस्यांनी मुद्दे उपस्थित केलेले आहे, येणाऱ्या बैठकीत जे मुद्दे उपस्थित केलेले आहे त्याची माहिती देण्यात यावी. भुमिगतला आत्तापर्यत किती पेमेंट केलेले आहे माहिती देण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी :आत्तापर्यंत भुमिगत गटार योजनेच्या मक्तेदाराला 232 कोटी रूपयांचे पेमेंट केलेले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :लेखा विभागात भुमिगतचे किती बील पेंडींग आहे.

मुख्यलेखाधिकारी :लेखा विभागात एकही बील थकीत नाही. सध्या 7 कोटी 20 लाखाचे बील आहेत.

श्री.राजगौरव वानखेडे :एक दिवस अगोदर माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :स्थायी समितीच्या बैठकीच्या एक दिवस अगोदर स.सदस्यांनी विचारलेली माहिती देण्यात यावी.

श्री.ऋषिकेश खैरे :समर्थनगर भागातील भुमिगत लाईनबाबत मागच्या बैठकीतही चर्चा केली होती, परंतु अद्यापपर्यंत कार्यवाही झालेली नाही.

कार्यकारी अभियंता : त्या भागात काही भागात अतिक्रमण आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य :गेल्या तीन बैठकीपासून हेच उत्तर ऐकण्यास येत आहे, तोच खुलासा करण्यात येत आहे.

कार्यकारी अभियंता :प्लॅन तयार करून संबधीत विभागाकडे दिलेला आहे. नोटीस दिलेल्या आहेत नोटीस पिरेड संपल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

विभाग प्रमुख (अतिक्रमण):सदरील विभागाकडुन सर्वेसंबधी कुठलाही नकाशा प्राप्त झालेली नाही. तथापी या ठिकाणी पहाणी करून श्री.एम.एम.खान, अभियंता पाहणी करण्याकरीता गेले होते, काही मालमत्ता अतिक्रमणामध्ये येत आहेत, त्यांना रितसर 206ची नोटीस तामील केलेली आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

कार्य.अभियंता :नकाशा सादर केलेला आहे, श्री.रविंद्र निकम, यांचेकडे नकाशा सादर केलेला आहे.

मा.सभापती :यंणाऱ्य बैठकीपुर्वी सदर कामास सुरूवात झाली पाहिजे. अहवाल स्थायी समितीमध्ये सादर करण्यात यावा.

श्रीमती किर्ती शिंदे :वार्डामध्ये सक्षम अधिकारी नसल्याने सर्व कामे ठप्प झालेली आहेत. सक्षम अधिकारी केव्हा देणार आहे.

श्री..ऋषीकेश खैरे :स्टाफ वाढवुन देण्यात यावा, अभियंत्याची वारवार बदली करण्यात येते,

उपआयुक्त (म) :वार्ड क्रमांक 2 च्या झोन अधिकारी श्रीमती शैलेजा डाके आहेत त्या रजेवर गेल्यामुळे श्री.जोशी यांचेकडे अतिरिक्त चार्ज दिलेला आहे.

श्रीमती किर्ती शिंदे :सक्षम अधिकारी दिला नाही तर अंदोलन करण्यात येईल.

मा.सभापती :आवश्यक अधिकाऱ्यांची व्यवस्था वार्ड कार्यालयात करण्यात यावी.

श्री. अजिम अहेमद :वार्डात अभियंत्याची आवश्यकता आहे.

उपआयुक्त (म) :आऊटसोर्सिंगद्वारे अभियंते शहर अभियंता यांचेकडे दिलेले आहेत.

मा.सभापती :व्यवस्था करण्यात यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :शहर अभियंता यांचेकडे कामाचा प्रचंड व्याप आहे, त्यामुळे कामास विलंब होत आहे. त्यांचेवरील कामाचा भार कमी करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य : वार्डात ज्युनिअर इंजिनिअर नाही, कंत्राटदाराला वाटेल तसा रस्त्याचे काम करीत आहे. वार्डात इंजिनिअर देण्यात यावा. काम पुर्ण होईपर्यंत संबधीत इंजिनिअरचे बील अदा करण्यात येऊ नये, कामाची तपासणी करून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती :स.सदस्यांच्या वार्डात ज्युनिअर इंजिनिअर देण्यात यावे, तसेच स.सदस्यांनी रस्त्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याची पाहणी करावी.

श्रीमती संगिता वाघुले :एखाद्या रस्त्याचे काम करत असतांना नागरीकांच्या सांगण्यानुसार साईड चेंज करून ते काम करू शकतो का?

शहर अभियंता :चेंज ऑफ साईडचा इश्यु आहे, प्लॅनवर सर्व गोष्टी अवलंबून आहे.

मा.सभापती :चेंज ऑफ साईडबाबत पाहणी करून योग्य तो नियमानुसार कार्यवाही करावी.

श्री.किर्ती शिंदे :वार्डातील रस्त्याचे कामाबाबत काहीच कार्यवाही झालेली नाही. विहीरींवर जाळी बसविण्यात यावी

शहर अभियंता :गणपती विसर्जनापुर्वी पॅचवर्कचे कामे करण्यात येतील. तसेच विसर्जन विहिरींच स्वच्छतेचे टेंडर झालेले आहे. साफसफाई वार्ड कार्यालया मार्फत करण्यात येईल.

मा.सभापती :तातडीने काम करण्यात यावे.

श्रीमती किर्ती शिंदे :मनपाच्या शालेय विद्यार्थ्यांना अद्यापपर्यंत गणवेश मिळालेला नाही माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

शिक्षणाधिकारी :विद्यार्थ्यांचे नांवे खाते उघडुन त्यांचे नांवावर रक्कम अदा करायची आहे याबाबत अडचणी आहेत, शिखर बँकेच्या अधिकाऱ्याशी बोलणी झालेली आहे, सर्व मुख्यध्यापकांची बैठक

बोलावली होती, त्या बैठकीतही खाते काढणे् व तदअनुषंगीक कार्यवाहीबाबत सूचना केलेल्या आहेत.

श्रीमती किर्ती शिंदे :चार दिवस बँकेला सुट्टी आहे, खाते उघडण्यास अनेक अडचणी आहेत.

मा.सभापती :सदरील काम चार दिवसात होणार कि नाही, याचा खुलासा करण्यात यावा.

श्रीमती संगिता वाघुले :विहित कालावधीमध्ये विद्यार्थ्यांचे खाते उघडण्यात आलेले नाही, त्यामुळे 15 ऑगस्टपुर्वी गणवेश विद्यार्थ्यांना कसे देणार खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :मागच्या बैठकीत जेव्हा प्रश्न उपस्थित झाला त्यावेळेस बैठक घेण्यात आली, सविस्तर चर्चा केलेली आहे, विद्यार्थ्यांचे ड्रेसेसचे पैसे मुख्यध्यापकांच्या अकाऊंटमध्ये ट्रान्सफर केलेले आहेत. वस्तुस्थिती ही आहे की, विद्यार्थी पालकांच्या नांवे खाते उघडले गेलेले नाही. आता चार दिवसात ड्रेस देणे शक्य नाही, पुणे येथे शासनानी एक बैठक आयोजित केलेली आहे त्या बैठकीमध्ये सूचना दिले जाणार आहे, मा.आयुक्त स्वत: बैठकीला हजर राहणार आहे, ड्रेस घेणे जरी बंधनकारक असले तरी खाते उघडने शक्य नाही, ही वस्तुस्थिती आहे.ती सांगण्यात येणार आहे.15 ऑगस्टला विद्यार्थ्यांना ड्रेस मिळणार नाही.

श्रीमती किर्ती शिंदे :300 रूपयांत ड्रेस शिवुन मिळत नाही 700 ते 800 रूपये ड्रेसला लागतात याची जाणीव शासनाला करून देण्यात यावी.

मा.सभापती :स.सदस्यानी ज्या सूचना या ठिकाणी मांडलेल्या आहेत, त्याची दखल घेवुन शासनास तसे कळविण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य:13 फेब्रुवारी 2017 रोजी नेरूळकर क्रिकेट अकॅदमी यांनी पत्र देवुन विनंती केलेली आहे की, गरवारे स्टेडियम वापरण्यासाठी दिल्यास सर्व मनपाच्या विद्यार्थ्यांना फायदा होईल, मोफत प्रशिक्षण देण्याची तयारी सदर संस्थेची आहे, सदर संस्था अतिशय उत्कृष्ठ काम करणारी आहे नावाजलेली आहे. अशा संस्थेचा फायदा महानगरपालिकेच्या गरीब विद्यार्थ्यांना झाल्यास ही चांगली गोष्ट आहे. शालेय क्रिकेट स्पर्धा आयोजित करेल व त्यातुन चांगले खेळाणारे विद्यार्थी हेरून त्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहेत. श्री.नेरळकर हे रणजी प्लेअर आहेत. प्रशासनाने सदरील अर्जाची दखल घेवुन त्याची गांभीर्याने दखल घेण्यात यावी.

मा.सभापती :महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल, गेल्या सहा महिण्यापासून त्यांची मागणी आहेत त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

श्रीमती शेख नरगीस :वार्ड क्रमांक 26 नेहरू नगर येथे चार दिवसाला पाणीपुरवठा केला जातो परंतु आता पुन्हा एका दिवसाचा खंड देवुन तो पाच दिवसांवर केलेला आहे.

श्री.अजिम अहेमद:वार्डात पिण्याचे घाण पाणी येत आहे, वारंवार सांगण्यात आले आहे पंरतु दखल घेतलेली नाही.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (पा/पू):स.सदस्य यांचे वार्डात पाईप लाईनचे काम चालू झालेले आहे. तसेच जायकवाडी येथील ट्रान्सफॉरमरची दुरूस्ती केलेली आहे, त्यामुळे शटडाऊन घेण्यात आला होता, त्यामुळे चार दिवसानंतर पाणीपुरवठा झालेला आहे आता ती दुरूस्ती करण्यात आलेली आहे.

श्री.अजीम अहेमद:आमच्याच वार्डामध्ये पाण्याची समस्या प्रत्येक वेळी का?

मा.सभापती :प्रशासनाने याची दखल घ्यावी.

श्रीमती देसरडा :वार्डात चार चार वेळेस पाणी येते, परंतु आमच्या कडे एक तास पाणी येत नाही.

मा.सभापती :सर्व वार्डामध्ये समान पाणीपुरवठा करण्यात यावा. वेळेवर पाणीपुरवठा करण्यात यावा.

श्रीमती मनिषा मुंडे :पाण्याचा प्रश्न कायम आहे तो मिटविण्यात यावा.

कार्य.अभियंता (पा/पू) :टेंडर ओपनिंग चार तारखेला आहे. सबमिशन 16 आणि 18 तारखेला ओपनिंग आहे.

श्रीमती मनिषा मुंडे :तीन वर्षापासून मागणी करत आहेत.

मा.सभापती :17 तारखेला माहिती देण्यात यावी. स.सदस्या श्रीमती देसरडा यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याचा खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता :स.सदस्य यांचे विनंतीनुसार पाणी सोडण्यात येते.

श्री.अझीम अहेमद :अंदाजपत्रक ते निविदा प्रक्रीया, वर्क ऑर्डर पर्यंत एक टाईमबॉन्ड ठरविण्यात यावे.

मा.सभापती :प्रलंबित टेडरची कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

श्रीमती स्वाती नागरे :स्मशानभुमीचे सर्व लाईट बंद अवस्थेत आहेत.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता (विद्युत) :लाईटचे काम केलेले आहे, मी स्वत: खात्री केलेली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :टि.व्हि.सेंटर ते जळगांव रोड, हडको, सिडको येथील रस्त्यावरील सर्व लाईट आजच्या आज चालु करण्या संदर्भात संबीतांना आदेशित करण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्या श्रीमती नागरे तसेव श्री.राजगौरव वानखेडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्दांवर तातडीने लाईट सुरू करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :एन-11 येथील स्मशानभुमीची भिंत पडलेली आहे. याबाबत मागील सभेत हा विषय मांडलेला आहे परंतु कुठलिही कार्यवाही होत नाही, अत्यावश्यक काम आहे 67(3) मध्ये काम करता येईल.

मा.सभापती :उपअभियंता विद्युत यांना कामाबाबत वारंवार सूचित केलेले आहे पंरतू कामामध्ये सुधारणा झालेली नाही. कामामध्ये सुधारणा करण्यात यावी. तसेच शहर अभिंयता यांनी स्मशानभुमि येथील भिंतीबाबत दखल घेण्यात यावी व काम तात्काळ पुर्ण करण्यात यावे.67 (3) मध्ये काम करण्यात यावे.

श्री.शेख मतीन : एल.ई.डी. च्या कामाबाबत माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :प्रशासनाने याबाबत तात्काळ बैठक घेवुन काम सुरू करण्याबाबत कार्यवाही करावी.

श्री.शेख मतीन :जाहिर प्रगटन देण्याबाबत माहिती देण्यात यावी.

विभाग प्रमुख (विद्युत) :कोणतेही जाहिर प्रगटन देतांना सबधीत विभाग हा महत्वाचे निवेदन असल्यास जास्तीच्या खपाच्या वर्तमानपत्रात देण्याबाबत पत्रात नमुद करण्यात येते.

श्री.शेख मतीन :जाहिर प्रगटन ---वर्तमानपत्रामध्ये देण्यात आले जे की कुणी वाचत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :एक प्रतिष्ठीत वर्तमानपत्र आहे, अशा प्रकारचे बोलणे योग्य नाही.

श्री.शेख मतीन :वर्तमानपत्रात जाहिर प्रगटन आलेले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :कुठल्याही वर्तमानपत्राचे नांव घ्यायला नाही पाहिजे, सर्वात जास्त सदरचा वर्तमानपत्र कोणत्या विभागात वाचत असेल तर तो यांचेकडे वाचला जातो.

श्री. अजिम अहेमद :एकाच वर्तमानपत्रामध्ये जाहिरात न देता सर्व वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात यावी. (याच वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात, )

मा.सभापती :कालची जाहिरात हि सर्व पेपरमध्ये आली होती, ----- चा शब्द इतिवृत्तामधून वगळण्यात यावा.

श्री.राजगौरव वानखेडे :होर्डीगबाबत सविस्तर माहिती पुढील बैठकीत देण्यात यावा. अधिकृत/अनाधिकृत होर्डीगची माहिती तसेच किती उत्पन्न प्राप्त झाले याची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :पुढील सभेपुर्वी सर्व सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :औरंगपूरा भाजीमंडई येथे कचरा साठला जातो, कचरा सफाई व्यवस्थीत होत नाही.

मा.सभापती :संबधीत विभागाने तातडीने सदरील ठिकाणी साफसफाईची कार्यवाही करावी तसेच दररोज कचरा उचलला जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

श्री.ऋषिकेश खैरे :माझा वार्ड मोठा असुन व्यापारीवर्ग जास्त प्रमाणात आहेत, त्यामुळे कचऱ्याचा प्रश्न मोठा आहे, त्या ठिकाणी एक रिक्शा किंवा ट्रॅक्टर देण्याबाबत संबधीत विभागाला विनंती केलेली आहे. जेणे करून तात्पुरती सोय होईल.

मा.सभापती :तातडीने वाहनाची पुर्तता करण्यात यावी. ज्या स.सदस्यांना कचऱ्यासाठी वाहनाची आवश्यकता आहे त्यांना आवश्यकतेनुसार वाहनाची व्यवस्था करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य:मागील इतिवृत्ताची प्रत आलेली नाही इतिवृत्त प्रत्येक सभेमध्ये येण्यात यावे.

मा.सभापती :श्री.मनोज मारवाडे, अतिरिक्त आयुक्तांचे स्विय सहाय्यक यांची बदली नगर सचिव विभागात करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.आयुक्तांनी याची दखल घ्यावी. इतिवृत्त प्रलंबिताची जबाबदारी प्रशासनाची राहील.

**विषय क्र. 66 : (शहर अभियंता)**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वार्ड क्र.102, कबीरनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.26,01,280/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सन 2016-17 या वित्तीय वर्षात महानगरपालिकेस प्राप्त रू.15.00 कोटी अनुदानांतर्गत करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाच्या रक्कम रू.26,01,280/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 66 ते 73 मंजूर करण्यात येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वार्ड क्र.102, कबीरनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.26,01,280/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 67 : (अभियंता झोन क्र.06)**

विषय : वॉर्ड क्र.89 चिकलठाणा येथील हनुमान चौक ते विमानतळ संरक्षक भिंती पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीट करणे, या कामाचे ठेकेदार श्री.धनंजय किसनराव कांबळे यांचेकडून 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.25,66,232/- पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : दरपत्रक सूचना (Closed offer) दि.15/04/2017

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | अभियंता - झोन क्र.06 |
| 2. | कामाचे स्वरुप | कॉंक्रीट करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 25,68,800/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | दैनिक लोकमत दिनांक 16/04/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ----- |

| | | |
|---|---|---|
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.04/05/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 01 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेद्दाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | श्री.धनंजय किसनराव कांबळे | 25,66,232/- | 0.10% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | --- |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नविन काँक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | मा.स्थायी समिती सभा दि.27/09/2016 विषय क्र.44 |
| | तरी विषयाकिंत काम ठेकेदार श्री.धनंजय किसनराव कांबळे यांचेकडून 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.25,66,232/- पर्यंत करून घेणेस टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणे/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.89 चिकलठाणा येथील हनुमान चौक ते विमानतळ संरक्षक भिंती पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीट करणे, या कामासाठी प्राप्त झालेले दरपत्रक सूचना (Closed offer) अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराची श्री.धनंजय किसनराव कांबळे यांची असल्याने, त्यांचेकडून 0.10% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.25,66,232/- पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 68 : (अभियंता झोन क्र.06)**

विषय : वॉर्ड क्र.38 अशोकनगर मसनतपुर येथील रस्त्याचे काँक्रीट करणे तसेच जलनि:सारण वाहीनी बदलणे, या कामाचे ठेकेदार मे.स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी औरंगाबाद यांचेकडून अ.प.दराने म्हणजेच टेंडर र.रू.9253061.15 पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र.2017 - AMCA -221505-1

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | अभियंता - झोन क्र.06 |
| 2. | कामाचे स्वरुप | रस्त्याचे काँक्रीटींग करणे तसेच जलनि:सारण वाहिनी बदलणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 9253061.15 |

| | | |
|---|---|---|
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई सेल विभागामार्फत प्रसिध्दी दि.22/05/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ----- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दिनांक 06/07/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 03 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी औरंगाबाद | 9253061.15 | अ.प. दराने |
| 2 | मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन औरंगाबाद | 9610229.31 | 3.86% जास्त दराने |
| 3 | मे.सहारा कन्स्ट्रक्शन | 9900775.44 | 7% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | --- |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.922 दि.18/02/2017 |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार मे.स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी औरंगाबाद यांचेकडून अ.प. दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.9253061.15 पर्यंत करून घेणेस टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणे/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.38 अशोकनगर मसनतपुर येथील रस्त्याचे कॉंक्रीट करणे तसेच जलनि:सारण वाहीनी बदलणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैंकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी औरंगाबाद यांचेकडून अ.प.दराने म्हणजेच टेंडर र.रू.9253061.15 पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 69 : (अभियंता झोन क्र.06)</u>**

विषय : वॉर्ड क्र.38 मसनतपुर येथे रस्त्याचे कॉंक्रीट करणे, या कामाचे ठेकेदार श्री.जागिरदार सबाहऊद्दीन यांचेकडून 2.21% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.2931936.84/- पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र.2017-AMCA-224038-3

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | अभियंता - झोन क्र.06 |
| 2. | कामाचे स्वरुप | रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. |

| | | |
|---|---|---|
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 2998197/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई सेल विभागामार्फत प्रसिध्दी दि.18/05/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ----- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दिनांक 12/07/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 04 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | श्री.जागिरदार सबाहऊद्दीन | 2931936.84 | 2.21% कमी दराने |
| 2 | श्री.महेश भागवत | 2983206.01 | 0.50% कमी दराने |
| 3 | मे.स्वराज कन्स्ट्रक्शन | 2992200.60 | 0.20% कमी दराने |
| 4 | श्री.अमोल दिलीप राठोड | 2997897.18 | 0.01% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | --- |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | दलित वस्ती सुधार योजना |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | --- |
| | तरी विषयाकिंत कामाचे अ.प. मंजुरीसह सदर काम ठेकेदार श्री.जागिरदार सबाहऊद्दीन यांचेकडून 2.21% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.2931936.84/- पर्यंत करून घेणेस टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणे/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.38 मसनतपुर येथे रस्त्याचे कॉंक्रीट करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.21% कमी दराचे निविदाधारक ठेकेदार श्री.जागिरदार सबाहऊद्दीन यांचेकडून टेंडर र.रू.2931936.84/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 70 : (अभियंता झोन क्र.06)**

विषय : वॉर्ड क्र.91 जयभवानीनगर येथील मंदिर जवळील रस्त्याचे कॉंक्रीट करणे, या कामाचे ठेकेदार मे.कासलीवाल कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प. दराने म्हणजेच टेंडर र.रू.2985010/- पर्यंत

करून घेणे अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : दरपत्रक सूचना (Close Offer) दिनांक 06/05/2017

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | अभियंता - झोन क्र.06 |
| 2. | कामाचे स्वरुप | रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 2985010/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | दरपत्रक सूचना (Close Offer) दिनांक 06/05/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ----- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दिनांक 18/05/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 01 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.कासलीवाल कन्स्ट्रक्शन | 2985010/- | अ. प. दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | --- |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | मा.स्थायी समिती सभा विषय क्र.139 दि.28/02/2017 |
| | तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.कासलीवाल कन्स्ट्रक्शन यांचेकडून अ.प. दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.2985010/- पर्यंत करून घेणेस टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणे/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.91 जयभवानीनगर येथील मंदिर जवळील रस्त्याचे कॉंक्रीट करणे, या कामासाठी प्राप्त झालेले दरपत्रक सूचना (Close Offer) अंदाजपत्रकीय दराने असल्याने सदर काम ठेकेदार मे.कासलीवाल कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प. दराने म्हणजेच टेंडर र.रू.2985010/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 71 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.79 न्यायनगर अंतर्गत स्वः पुंडलिक राऊत यांचा पुतळा ते मा.उच्च न्यायालय संरक्षित भिंती पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2015-16 च्या दरसुचीनुसार र.रू.39,50,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन 2017-18 च्या अर्थसंकल्पातील नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षक मधुन प्रस्तावित करण्यात येईल.

करीता अंदाजपत्रक रू.39,50,000/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.79 न्यायनगर अंतर्गत स्वः पुंडलिक राऊत यांचा पुतळा ते मा.उच्च न्यायालय संरक्षित भिंती पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.39,50,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 72 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.-3 अंतर्गत विविध रस्त्यांची दुरूस्ती व डांबरी रस्त्याचे पॅचवर्क करणे बाबत या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2015-16 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.49,44,474/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावीत कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2017-18 च्या अर्थसंकल्पातील पान क्र.1 अनुक्रमांक 5 मध्ये उपलब्ध रस्ते दुरूस्ती पॅचवर्क या लेखाशिर्षकात ठेवण्यात आलेल्या 140.00 लक्ष तरतुद मधुन करण्यात येणार आहे. प्रस्तावीत अंदाजपत्रकात रस्त्यास, वेट मिक्स करणे व पॅचवर्क करणे इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करिता प्रस्तावित कामाचे रक्कम रू.49,44,474/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.-3 अंतर्गत विविध रस्त्यांची दुरूस्ती व डांबरी रस्त्याचे पॅचवर्क करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.49,44,474/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 73 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संचालक श्री.धनंजय किसन कांबळे, रा.बीडबायपास व संचालक सेव्हन ऐलेव्हन लॉजिस्टिक ॲण्ड इन्फ्रा स्ट्रक्चर प्रा.लि. औरंगाबाद यांनी मौजे चिकलठाणा येथील गट क्र.231 मधील 01 एकर जागा तात्पुरत्या स्वरूपात महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी सुरू असलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामासाठीचे साहित्य (प्लँट) ठेवणेसाठी जागा भाडेतत्वावर मिळणे बाबत विनंती केली आहे. त्यासाठी सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे प्रतीमाह भाडे रक्कम रू.40,480/- एवढे आकारणी करण्यात आलेली आहे. तीन वर्षाच्या कालावधीसाठी शहरात विविध ठिकाणी सिमेंट रस्त्याच्या कामासाठीचे साहित्य (प्लँट) ठेवणेसाठी जागा भाडेतत्वावर देणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.रेणुकादास वैद्य : विषय क्रमांक 73 मध्ये नियमानुसार कार्यवाही करावी. मनपाच्या जागा अशाच पध्दतीने भाडे तत्वावर देऊ शकतात.

श्री.राजगौरव वानखेडे :सक्षमपध्दतीने करारनामा करण्यात यावा. लीगलपध्दतीने महानगरपालिकेचे हित जोपासत करारनामा करण्यात यावा.

मा.सभापती : एक वर्षासाठी वर्कऑर्डर असणार आहे. प्रस्ताव मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संचालक श्री.धनंजय किसन कांबळे, रा.बीडबायपास व संचालक सेव्हन ऐलेव्हन लॉजिस्टिक ॲण्ड इन्फ्रा स्ट्रक्चर प्रा.लि. औरंगाबाद यांनी मौजे चिकलठाणा येथील गट क्र.231 मधील 01 एकर जागा तात्पुरत्या स्वरूपात महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी सुरू असलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामासाठीचे साहित्य (प्लँट) ठेवणेसाठी जागा भाडेतत्वावर मिळणे बाबत विनंती केली असल्यामुळे, त्यासाठी सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे प्रतीमाह भाडे रक्कम रू.40,480/- आकारणी करणेस व तीन वर्षाच्या कालावधीसाठी शहरात विविध ठिकाणी सिमेंट रस्त्याच्या कामासाठीचे साहित्य (प्लँट) ठेवणेसाठी जागा भाडेतत्वावर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 74 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, मनपाच्या विविध विभागासाठी खाजगी मजुर यांची आवश्यकता असल्यामुळे व मनपाकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे ई-निविदेद्वारे निविदा मागविण्यात आली होती. या निविदेमध्ये महानगरपालिकेने कोणतेही दर दिलेले नव्हते. त्यामध्ये खालील एजन्सीने निविदा भरणा केलेले आहे.

01. देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, नाशिक
02. जयबजरंग सर्व्हीसेस
03. आस्था सुशिक्षित बेरोजगार संस्था मर्या. धुळे

उपरोक्त एजन्सीपैकी निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या 03 एजन्सीचे व्यावसायिक दर उघडण्यास निविदा समितीने मंजुरी दिल्यानुसार खालीलप्रमाणे एजन्सीचे दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | खाजगी मजुरांचे दर |
|---|---|---|
| 01. | देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, नाशिक | 20,911/- |
| 02. | जयबजरंग सर्व्हीसेस | 18,559/- |
| 03. | आस्था सुशिक्षित बेरोजगार संस्था मर्या. धुळे | 18,918/- |

तुलनात्मकदृष्ट्या जयबजरंग सर्व्हीसेस यांचे दर सर्वात कमी व त्यांनी त्यांचा दराचा पृथ्थ:करण तक्ता सादर केलेला आहे. सदरील निविदेतील प्राप्त दर महाराष्ट्र शासन निर्णय बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्ध करून घेतांना अनुसरावयाच्या बंधनकारक बाबी दिनांक 19 मार्च 2014 च्या नुसार हे मनपा आस्थापनेवरील कायमस्वरूपी पदावरील खर्चापेक्षा जास्त होणार नाही. त्यामध्ये 10 ते 25% बचत होईल याची दक्षता घ्यावी. त्यामुळे वरील दराबाबत सर्वात कमी दर असणाऱ्या एजन्सीला वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले होते. वाटाघाटीसाठी संबंधीत एजन्सीने 13,950/- या दरावर काम करण्यास तयार असल्याची लेखी संमती दिली आहे.

संबंधीताने निविदेतील अटी शर्तीचे पालन केले आहे व त्यांचे दर सर्वात कमी असुन वाटाघाटीअंती निश्चित झालेल्या दरावरून खाजगी मजुर यांची आवश्यकतेनुसार 11 महिन्यांसाठी पुरवठा करण्याचे काम जयबजरंग सर्व्हीसेस या एजन्सीला देण्याबाबत निविदा समितीने शिफारस केलेली आहे. करिता विभागांनी आवश्यकतेनुसार मागणी केल्याप्रमाणे खाजगी मजुर यांचा मनपाला पुरवठा करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 74

श्री.राजगौरव वानखेडे :माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त (म) :मनपा आस्थापनेवर 1604 सफाई मजूर आहेत. आवश्यकतेप्रमाणे जशी मागणी येईल त्याप्रमाणे पुरवठा होणार आहे. सफाई मजूर,ड्रेनेज मजूर व इतर मजूरांची जशी आवश्यकता पडेल तसा पुरवठा होईल.

मा.सभापती :विषय क्रमांक 74 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या विविध विभागासाठी खाजगी मजुरांचा पुरवठा करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक जयबजरंग सर्व्हीसेस यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार संबंधीत एजन्सीकडून रू.13,950/- या दराने काम करून घेण्यास तसेच खाजगी मजुर यांची आवश्यकतेनुसार 11 महिन्यांसाठी पुरवठा करण्याचे काम जयबजरंग सर्व्हीसेस या एजन्सीला देण्यास आणि विभागांनी आवश्यकतेनुसार मागणी केल्याप्रमाणे खाजगी मजुर यांचा मनपाला पुरवठा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 75 :**

विषय : वार्ड क अंतर्गत विविध रस्त्यांची दुरूस्ती व डांबरी रस्त्याचे पॅचवर्क करणे.

महोदय,

या कामाचे ठेकेदार ए.एस.कन्स्ट्रक्शन यांनी 0.50% कमी दराने करणेस संमती दिली आहे. टेंडर र.रू.49,44,474/- तरी मानणीय स्थायी समिती मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र.2016-AMCA- 177338-7

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | झोन क्र.3 |
| 2. | कामाचे स्वरुप | डांबरी पॅचवर्क करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | विषय क्र.82 दि.24/11/2016 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 49,44,474/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | - |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ----- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दिनांक 31/05/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 01 एक |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नांव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त** |
|---|---|---|---|
| 1 | ए.एस. कन्स्ट्रक्शन | 49,19,751.65/- | - 0.50% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | आहे |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | आहे |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | निरंक |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | डांबरी रस्ते पॅचवर्क |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | महापालिका फंडामधुन |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | निरंक |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्राकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | सोबत जोडला आहे. |

| | |
|---|---|
| | तरी विषयांकित काम ठेकेदार ए.एस. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून 0.50% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.49,44,474/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. |

मा.सभापती :विषय क्रमांक 75 व 76 मंजूर, भुमिगत अहवाल आलेला, पाणीपुरवठ्याबाबतचा अहवालावर पुढील बैठकीत चर्चा करण्यात येईल. तसेच Financial ऑडीट पुढील सभेमध्ये सादर करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क अंतर्गत विविध रस्त्यांची दुरूस्ती व डांबरी रस्त्याचे पॅचवर्क करणे या कामासाठी एकच निविदा प्राप्त झाल्याने, निविदाधारक ठेकेदार ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून 0.50% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.49,44,474/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 76 :**

विषय : वार्ड क्र.98 उल्कानगरी येथील आदित्यनगर मुख्य रस्त्याचे व्हाईट टॉपींग कॉंक्रीटद्वारे विकास करणे या कामाचे ठेकेदार श्री.अक्षय मनोज बारवाल यांचेकडून 0.90 टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये 33,55,908.91/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समिती / मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.AMCA- 203324-12 सन 2016-2017

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता झोन क्र.4 ते 7 व 9 कार्यालय |
| 2. | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.98 उल्कानगरी येथील आदित्यनगर मुख्य रस्त्याचे व्हाईट टॉपींग कॉंक्रीटद्वारे विकास करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 3386386.00/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 3386386.00/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई-टेंडर |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 20/04/2017 ते 30/05/2017 पर्यंत 41 दिवस |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 01/06/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | सदर कामासाठी चार वेळेस निविदा मागविण्यात आले असता एक निविदा प्राप्त झाली. |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेद्दाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | श्री.अक्षय मनोज बारवाल | 3355908.91/- | 0.90 टक्के कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |

| | | |
|---|---|---|
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | मंजुर रेखाकंनातील नविन कॉंक्रीट रस्ते |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |
| | तरी विषयांकित प्रकरणी ठेकेदार श्री.अक्षय मनोज बारवाल यांचेकडून 0.90 टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.33,55,908.91/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.98 उल्कानगरी येथील आदित्यनगर मुख्य रस्त्याचे व्हाईट टॉपींग कॉंक्रीटद्वारे विकास करणे या कामासाठी एकच निविदा प्राप्त झाल्याने, निविदाधारक ठेकेदार श्री.अक्षय मनोज बारवाल यांचेकडून 0.90 टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये 33,55,908.91/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद